बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३६० । वार रविवार दि २१ सप्टेंबर एएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 350 Sunday 21 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# विनयभंग व पोक्सो गुन्ह्यातील नराधम आरोपी बेडसकराला अटक नाही तर केज पोलीसांनी सन्मानाने सोडून दिले?

## आरोपी बेडसकर ठाण्यात हजर असताना फरार होतो कसा, त्यावेळी पोलीस अधिकारी पोलीस ठाण्यातील खुर्च्या मोजत होते का?

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक :- दिपक थोरात मो.९८६०८९८५६४





# आरोपीला कायद्यातून मोकळीक पळवाटा आणि पीडितेला न्यायासाठी धावपळ हेच का राज्याचं बेटी बचाओ वास्तव?

### सिंधी गावातील एका बड्या राजकीय नेत्यानेच बेडसकरला फरार करण्यात मदत केली असल्याची चर्चा?

### एसपी कॉवत साहेब, पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणाऱ्या पोलीस निरीक्षक उनवणेंवर निलंबनाची कारवाईसाठी नागरिकांची गर्जना?

बीड (प्रतिनिधी):– शिक्षण क्षेत्र हे आदर्श, संस्कार व नैतिकतेचा पाया मानले जाते. पण या क्षेत्रातच काम करणाऱ्या केजचे गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर या अधिकाऱ्याच्या नराधमक कृत्यामुळे संपूर्ण विभागावर कलंक लागला आहे. बेडसकर याच्यावर अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाचा गंभीर गुन्हा केज पोलीस ठाण्यात दाखल झाला असून, पोक्सो अंतर्गतही कारवाई झाली आहे. तरीदेखील हा आरोपी पोलीस ठाण्यात हजर असतानाच फरार झाला, ही धक्कादायक बाब समोर आली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

स्थानिक पातळीवर अशी चर्चा रंगली आहे की, बेडसकर याला त्याच्याच सिंधी गावातील एका बड्या नेत्याने फरार होण्यास मदत केली. आरोपीला पकडण्याऐवजी संरक्षण मिळत असल्याच्या चर्चेने पोलिस यंत्रणेची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सर्वात गंभीर प्रश्न असा आहे की, गुन्हा दाखल झालेल्या बेडस्करला जेव्हा पोलीस ठाण्यात बोलावले होते, तेव्हा तो ठाण्यात हजर असतानाच फरार कसा झाला? त्या वेळी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे व संपूर्ण पोलीस कर्मचारी काय करत होते? आरोपीला मुद्दाम सोडून देण्यात आले का? अशा अनेक प्रश्नांनी प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे.

बेडसकरचे हे पहिलेच प्रकरण नाही. लक्ष्मण बेडस्करवर यापूर्वी देखील अनेक महिला विनयभंगाचे आरोप करीत आल्या आहेत. पैसा, पॉलिटिकल पॉवर आणि पदाचा गैरवापर करून त्याने आपले कुकर्म दडपण्याचे प्रकार सातत्याने केले आहेत. स्थानिक पातळीवरील काही मातब्बर नेते व राजकारण्यांचे संरक्षण लाभल्यामुळेच हा अधिकारी वर्षानुवर्षे बचावत असल्याचे आरोप होत आहेत. अशा नराधमाने शिक्षण क्षेत्राला डागाळले आहे. व्हाईट कॉलर गुन्ह्यांचा बादशाह ठरलेल्या बेडसकरमुळे नागरिकांच्या मनात संताप व भीती निर्माण झाली आहे.

बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार बांधवांनी एकमुखी मागणी केली आहे की, अशा नराधमाला तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा व्हावी. तसेच, त्याला आजवर संरक्षण देणाऱ्या पोलीस व राजकीय नेत्यांचीही सखोल चौकशी करण्यात यावी. आरोपी ठाण्यात हजर असताना तो फरार होणे ही पोलीस प्रशासनाची मोठी चूक असून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे आवश्यक असल्याची मागणी अधिक जोर धरत आहे. समाजाचा विश्वास पुन्हा जिंकायचा असेल, तर पोलिसांनी तात्काळ कारवाई करून बेडस्करला लोखंडाच्या चौकटीत डांबले पाहिजे. अन्यथा नागरिकांचा विश्वासच नाही तर पोलीस प्रशासनाची प्रतिष्ठाही डागाळण्याचा धोका निर्माण होईल.




### सत्य दडपण्याचा प्रयत्न केला तर 'दै. महाराष्ट्र आरंभ' अजून जोरक रस आवाज उठवणार!

अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाचा गंभीर गुन्हा दाखल झाल्याने जिल्हाभरात खळबळ माजली आहे. मात्र या प्रकरणात केज पोलिसांकडून सत्य दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. जर खरोखरच असे घडले, तर याविरोधात दै. महाराष्ट्र आरंभ अजून जोरकस आवाज उठवणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. आरोपी बेडसकरला यापूर्वी राजकीय संरक्षण लाभल्यामुळे अनेक प्रकरणांतून सुटका झाली आहे. आता देखील पोलीस यंत्रणेकडून आरोपीला वाचवण्याचे डावपेच खेळले जात आहेत का, असा संशय नागरिक आणि पत्रकार बांधवांमध्ये व्यक्त होत आहे. मात्र सत्य कधीच दडपता येत नाही, ते उघडकीस आलंच पाहिजे, या ठाम भूमिकेतून दै. महाराष्ट्र आरंभ निर्भीड लेखणी बुलंद करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### आधीपासूनच लक्ष्मण बेडसकर वादग्रस्त राजकीय आश्रयामुळेच बचावला?

लक्ष्मण बेडसकरचा हा प्रकार पहिलाच नाही तर यापूर्वी देखील अनेक महिलांनी अश्लील वर्तन व विनयभंगाचे आरोप केले आहेत. पण प्रत्येक वेळी पैसा, राजकीय ताकद आणि अधिकाऱ्यांचे पद यांचा गैरवापर करून त्याने आपल्या कुकर्मांवर पांघरूण घातले असल्याचे उघड होत आहे. अनेक महिला शिक्षक व कर्मचाऱ्यांनी यापूर्वी बेडस्करच्या वर्तनाविषयी तक्रारी केल्या होत्या. परंतु त्या तक्रारींना नेहमीच दाबून टाकण्यात आले. पीडित महिलांना मानसिक त्रास देत गप्प बसवण्याचे प्रकार झाल्याचे आरोप आहेत. स्थानिक पातळीवरील काही मातब्बर नेते आणि राजकीय मंडळींनी बेडसकरला वर्षानुवर्षे संरक्षण दिले, असा जनतेमध्ये ठाम समज आहे. त्यामुळेच त्याच्यावर गंभीर आरोप होऊनही त्याला अद्याप शिक्षा झाली नाही. प्रत्येक वेळी तो पोलीस आणि प्रशासनाच्या नजरेआड जाऊन वादातून सुखरूप बाहेर पडत राहिला.

### सिंधी गावातील बड्या नेत्याची संरक्षणछत्री; राजकीय हस्तक्षेपामुळे तपासाला पायबंद?

विनयभंगाचा गंभीर गुन्हा दाखल असून पोक्सो अंतर्गत कारवाई झाली तरीदेखील आरोपी पोलिस ठाण्यात हजर असतानाच फरार झाला. या घटनेमुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. मात्र यामागे सिंधी गावातील एका बड्या राजकीय नेत्याची संरक्षणछत्री असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. आरोपी लक्ष्मण बेडसकर हा पोलीस ठाण्यात हजर असताना पोलिसांच्या नजरेआड होऊन पळाला, ही गोष्ट सर्वसामान्यांच्या डोक्यात बसत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये हा प्रश्न चर्चेचा विषय बनला आहे की, आरोपीला पळण्यासाठी पोलीस व काही प्रभावशाली लोकांचीच मदत मिळाली का? त्याला फरार करण्यात ज्या नेत्याचा हात असल्याचे बोलले जाते, त्या नावाने बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. जर राजकारण्यांच्या संरक्षणछत्रीखाली गुन्हेगारांना अशा प्रकारे पोलीस ठाण्यातूनच फरार होता येत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांचा पोलिसांवर विश्वास कसा राहणार? असा सवाल संतप्त नागरिक करत आहेत. आरोपीला संरक्षण देणाऱ्या नेत्याचे नाव जाहीर करून त्याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून पुढे येत आहे.

### आरोपी पोलीस ठाण्यात हजर असताना तो पळतो कसा? पोलिस प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह!

विनयभंगाचा गंभीर गुन्हा पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंदविल्यानंतर सर्वात मोठा धक्का म्हणजे आरोपी पोलिस ठाण्यात हजर असतानाच फरार झाला. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून पोलीस प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नियमाप्रमाणे आरोपीवर गंभीर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याला तात्काळ ताब्यात घेणे अपेक्षित असते. पण बेडस्करला ठाण्यात बोलावूनही त्याला अटक करण्यात आली नाही. उलट, तो पोलिसांच्या नजरेआड होऊन गायब झाला. हे नेमके कसे घडले? हा निष्काळजीपणा होता की मुद्दाम केलेली डील? या प्रश्नाने सर्वत्र खळबळ उडाली आहे. यावेळी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्यासह संपूर्ण कर्मचारी ठाण्यात उपस्थित असतानाही आरोपी कसा पळून गेला? त्याला कोण संरक्षण देत होते? आरोपीला पळून जाण्यासाठी संधी देण्यात आली का? असा गंभीर सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

### पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणाऱ्या पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांचे निलंबन करा?

आरोपी पोलीस ठाण्यात हजर असतानाच फरार झाला. या धक्कादायक घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि पोलिस प्रशासनावर विश्वासाचे गंभीर प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. विशेषत: केज पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांचे कार्यप्रणालीवर संतप्त नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आरोपी ठाण्यात हजर असतानाच फरार होणे म्हणजे पोलीस प्रशासनाचा निष्काळजीपणा किंवा आरोपीला संरक्षण देणे, असा संशय निर्माण झाला आहे. या घटनेमुळे पोलीस दलाची प्रतिमा गंभीरपणे मलिन झाली असून, नागरिकांची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. नागरिकांनी एसपी नवनीत कॉवत साहेबांकडे धडाकेबाज मागणी केली आहे की, पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करावी. जर जबाबदार अधिकारी योग्य ती कारवाई न केली, तर पोलिस प्रशासनावर जनतेचा विश्वास कायम राहणार नाही, असा इशारा नागरिकांकडून दिला जात आहे.

### शिक्षण क्षेत्राला डागाळणाऱ्या बेडसकरला फाशीची शिक्षा द्यावी : सामाजिक कार्यकर्ते इंजि.सादिक इनामदार



गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी सोळा वर्षाखालील मुली, काही शिक्षिका, विधवा आणि खाजगी महिला यांना पैशाचे व नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्यावर कहर केला. या नराधमक अधिकारीच्या कृत्यामुळे अनेक निर्दोष व्यक्तींचे जीवन संकटात आले आहे. सामाजिक भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनियर सादिक इनामदार यांनी तात्काळ या प्रकरणाचा सखोल तपास लावावा आणि आरोपी लक्ष्मण बेडसकरला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी केली आहे. याशिवाय, या प्रकरणामध्ये दोषी ठरलेल्या इतर सहाय्यकांनीही तपासला जावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या संरक्षणाखाली अशा प्रकारच्या कुकृत्यांना कायम राहू दिले तर शिक्षण विभागाची प्रतिमा डागाळली जाईल, असा इशारा दिला आहे.

CMYK

सायं. दैनिक महाराष्ट्र
आरंभ

संपादकीय

बीड (महाराष्ट्र) रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०२५



## संपादकीय...

# ऑनलाइन गेमिंग! संधी की संकट?

कौशल्यावर आधारित ऑनलाइन खेळांविषयी विचार करता, हे गेम्स पूर्णपणे स्पर्धात्मक कौशल्य, अभ्यास, एकाग्रता आणि धोरणात्मक विचार यावर आधारलेले असतात. यात बुद्धीला चालना देणारे व्हिडिओ गेम्स, पझल्स, क्विझ, शैक्षणिक प्स तसेच टीमवर्क वाढवणारे मल्टीप्लेयर गेम्स यांचा समावेश होतो. हे गेम्स विद्यार्थ्यांचे विषयातील ज्ञान वाढवतात, त्यांच्यातील तार्कीक विचारशक्ती आणि वेगवेगळ्या विषयांच्या कौशल्याचा विकास करतात.

उदाहरणार्थ, भाषिक कौशल्यासाठी शब्दकोडी, गणिती विचारसरणीसाठी गणिती पझल्स, किंवा विज्ञान, इतिहास, भूगोल विषयांचा प्रत्यय आणून देणारे शैक्षणिक सिम्युलेशन गेम्स हे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरतात. ते मुख्यतः मनोरंजन व शिक्षण याची सांगड घालतात. अशा गेम्समध्ये आर्थिक व्यवहार किंवा लकी ड्रॉ सारखी संधी किंवा आकर्षण नसते, त्यामुळे अपायकारक व्यसनोत्सुकता अथवा सामाजिक, आर्थिक धोके उद्भवत नाहीत.

निखळ करमणुकीसाठी विकसित निमेटेड फिल्म्स यांचे स्वरूप बऱ्याच प्रसंगी मूल्यशिक्षण, सर्जनाशी व्यक्तिमत्व विकास, कल्पनाशक्तीला वाव देणे आणि आरामदायक विरंगुळा हेच असते. निमेटेड फिल्म्स या मुलांसाठी तसेच प्रौढांसाठीही तितकेच आकर्षक माध्यम असतात. या माध्यमातून सृजनशील कथानक, गोड संगीत, रंगीत पात्रे आणि तंत्रज्ञानाचा मनोवेधक उपयोग पाहायला मिळतो. या फिल्म्स ज्ञानवर्धनासोबत मनोरंजन, दैनंदिन जगण्याचा गोडवा, संस्कार, जीवनमूल्यांचे संदेश, सामाजिक प्रश्न यासारख्या मुद्द्यांवर सकारात्मक प्रभाव पाडतात. उदा हनुमान, महावतार नरसिंह आदी.

तिसरा प्रकार म्हणजे पैसे लावावे लागणारे जुगार किंवा बेटिंगचे खेळ. यांचे वैशिष्ट्य म्हणजे यातून निर्माण होणारा फक्त निव्वळ आर्थिक लाभ अथवा तोटा या भावनेला केंद्रस्थानी आहे. कौशल्य, शिक्षण किंवा आरोग्य या काहीच गोष्टींशी याचा थेट संबंध नसतो. पैसे किंवा मालमत्तेवर सट्टा लावून येणाऱ्या अपयश-यशाचा प्रवास हा अनेकदा नशेशिवाय, अनियंत्रित, विकृत आणि व्यसनात्मक असतो. यात लकी ड्रॉ, काड्र्स, नंबर गेम्स, कॅसिनो गेम्स, ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्म्स, क्रिकेट किंवा फुटबॉलसारख्या खेळांवर फेस-टू-फेस किंवा ऑनलाइन सट्टेबाजी, अशी रूपे आहेत.

कोणते तीन पैलू स्पष्ट दिसतात?

तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाइन गेमिंगचे तीन पैलू स्पष्ट दिसतात - शिक्षण व कौशल्यवर्धन, संस्कार आणि मनोरंजन देणारे निमेशन आणि व्यसनमूलक जुगार. पहिले दोन अंग समाजासाठी उपयुक्त तर तिसरे अंग विनाशकारी. त्यामुळे तरुण पिढीला योग्य वेळी मार्गदर्शन देणे ही पालक, शिक्षक आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

निमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स व एक्सटेंडेड रिलिटीला प्रोत्साहन

कला, कौशल्य व तंत्रज्ञान यांचा संगम
रोजगार निर्मिती आणि तरुणांना संधी
सुरक्षित गेम्सचे फायदे
पझल्स व क्विझमुळे ज्ञानवृद्धी
भाषिक व गणिती कौशल्य वृद्धिंगत
टीमवर्क आणि तार्किक
विचारशक्ती वाढ
जुगाराचे धोके
आर्थिक नुकसान आणि कर्जबाजारीपणा
मानसिक ताण व नातेसंबंधातील तणाव
गुन्हेगारी व व्यसनाचा धोका
पालक व शिक्षकांची भूमिका

आज मोबाइल हा मुलांच्या हातात सहज पोहोचतो. अशावेळी पालक आणि शिक्षकांनी मार्गदर्शन करणे अपरिहार्य आहे. कायदेशीर आणि बेकायदेशीर खेळांमधील फरक मुलांना समजावून सांगणे गरजेचे आहे. सुरक्षित, शिक्षणपूरक गेम्स निवडून देणे, तसेच मैदानावरील खेळ, वाचन, कला व छंद याकडे वळवणे आवश्यक आहे. पालक स्वतः मोबाइल व्यसनात अडकले तर मुलांकडून आदर्श वर्तनाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. शाळा-महाविद्यालयांत नागरिकशास्त्र विषयात ऑनलाइन व्यसनाचे दुष्परिणाम शिकवले गेले पाहिजेत.

श्रीमंत होण्याचा हव्यास...

हे खेळ सुरुवातीला चित्तथरारक, मोहक आणि 'लवकर श्रीमंत होण्याचा' हव्यास निर्माण करणारे असले तरी पुढे जाऊन आर्थिक नुकसान, मानसिक आरोग्याच्या समस्या, सामाजिक आणि कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव आणि अनेकदा गुन्हेगारी जन्मास घालतात. यामुळेच यावर कायद्याने बंदी आहे.


निखळ करमणुकीसाठी विकसित निमेटेड फिल्म्स यांचे स्वरूप बऱ्याच प्रसंगी मूल्यशिक्षण, सर्जनाशी व्यक्तिमत्व विकास, कल्पनाशक्तीला वाव देणे आणि आरामदायक विरंगुळा हेच असते. निमेटेड फिल्म्स या मुलांसाठी तसेच प्रौढांसाठीही तितकेच आकर्षक माध्यम असतात. या माध्यमातून सृजनशील कथानक, गोड संगीत, रंगीत पात्रे आणि तंत्रज्ञानाचा मनोवेधक उपयोग पाहायला मिळतो. या फिल्म्स ज्ञानवर्धनासोबत मनोरंजन, दैनंदिन जगण्याचा गोडवा, संस्कार, जीवनमूल्यांचे संदेश, सामाजिक प्रश्न यासारख्या मुद्द्यांवर सकारात्मक प्रभाव पाडतात. उदा हनुमान, महावतार नरसिंह आदी.

तिसरा प्रकार म्हणजे पैसे लावावे लागणारे जुगार किंवा बेटिंगचे खेळ. यांचे वैशिष्ट्य म्हणजे यातून निर्माण होणारा फक्त निव्वळ आर्थिक लाभ अथवा तोटा या भावनेला केंद्रस्थानी आहे.

## अतिवृष्टीचा फटका; १९ लाख शेतकरी बाधित

# मराठवाड्यात १,४१८ कोटी रुपयांचे नुकसान





प्रतिनिधी (छत्रपती संभाजीनगर):- यंदा जुलै महिन्यापासून सातत्याने पाऊस होत आहे. तर साधारण महिनाभरापासून जोरदार पाऊस होत असल्याने अनेक भागात अतिवृष्टी झाल्याची नोंद करण्यात आली आहे. या अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्यात यंदाच्या पावसाळयात झालेल्या अतिवृष्टीने हजारो गावे बाधित झाली असून १ हजार ४१८ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

मागच्या आठवडाभरापासून मराठवाड्यातल्या सगळ्याच भागात अतिवृष्टी, ढगफुटीसारखा पाऊस झाल्यामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. शिवाय शेतजमिनी वाहून गेल्या आहेत. अनेक घरांची पडझड झाली. यामुळे मराठवाड्यात १,४१८ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज असून या नुकसानीसाठी पन्नास टक्के म्हणजेच ६३० कोटींची मदत शासनाने १८ सप्टेंबरपर्यंत मंजूर केल्याचे सांगण्यात येत आहे. मराठवाड्यातील चार जिल्ह्यांतील ऑगस्ट महिन्यातील नुकसानीचे आकडे अद्याप स्पष्ट नाहीत. तसेच अद्याप सप्टेंबरमधील नुकसानीचा आकडा समोर आला नाही. सर्वाधिक नुकसान हे सप्टेंबर महिन्यात झाले आहे. शिवाय सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीचे पंचनाम्यानुसार किती मदत लागणार, हे स्पष्ट नाही.

आतापर्यंत ५ हजार गावांतील १९ लाख शेतकरी बाधित झाले. मंजूर निधीत ५० टक्के फरक

अनेक ठिकाणी पाणी साचल्याने शेतात जाता येत नाही. तर ई-पीक पाहणी सर्व्हर डाऊन असणे, शेतकऱ्यांच्या जमिनीचे लोकेशन चुकीचे दिसणे, खाते क्रमांक न जुळणे आदी अडचणींमुळे शेतकरी ई-पीक नोंदणी करू शकले नाहीत. शासनाकडे केलेली मागणी आणि मंजूर केलेल्या निधीत ५० टक्के फरक सध्या आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यात प्रामुख्याने पीक नोंदणी, आधार-बँक खाते लिंक नसणे, पंचनामा प्रक्रियेतील विलंब, नैसर्गिक आपत्तीनंतर मदतीची प्रतीक्षा व निधी वितरणातील समस्या या प्रमुख अडचणी आहेत.

पान ४ वरून..

### आष्टी पोलिसांनी एकाच वेळी दोन गुटखा माफियांना मुद्देमालासह पकडले!

याच्याकडून १ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त करत गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक शरद भुतेकर,पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर,संतोष दराडे,गुंजाळ, जमदाडे,तांदळे,मुंडे,पोलीस अंमलदार मजरूद्दीन सय्यद, अशोक तांबे,बब्रुवाण वाणी, सद्दाम शेख,लोमटे, महिला पोलीस अंमलदार मर्जीना शेख,यांनी केलीह्व

-अ---------------------

### सुकळीकरांचा स्फोटक एल्गार : उपोषणाचा पाचवा दिवस पेटला राजकीय दबाव प्रशासनाचा कानाडोळा

प्रकृती अचानक खालावली. जिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने तातडीने तपासणी करून चार जणांना दाखल करण्याचा सल्ला दिला; मात्र मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सोडणार नाही, असा ठाम नकार उपोषणकर्त्यांनी दिला. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण असून अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. खामगावच्या गावगुंडांचा अडथळा - ग्रामस्थांमध्ये संताप उसळला परळी तालुक्यातील खामगावमधील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी सुकळी गावाकडे जाणारा रस्ता मोठ्या दगडांनी अडवून या रस्त्याने गेलात तर जीव घेऊ, अशा उघड धमक्या दिल्याचा आरोप आहे. पोलिसांना याची माहिती दिल्यानंतरही अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये रोष आहे हा आमच्या जगण्याचा प्रश्न रेल्वे उड्डाणपुलामुळे सुकळी गावाला बीड-परळी महामार्गाशी कायमस्वरूपी सुरक्षित संपर्क मिळणार आहे. पावसाळ्यात गुणवती तलाव भरल्यास गावाचा बाहेरील जगाशी संपर्क तुटण्याची भीती आहे. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, विद्यार्थ्यांची शाळा, शेतमाल वाहतूक सगळे ठप्प होण्याचा धोका ग्रामस्थांनी अधोरेखित केला आहे.हा आमच्या जगण्याचा आणि मरण्याचा प्रश्न आहे,असा उद्विग्न आवाज ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडला.आम्ही मतदान दिलं, पण विकासाचा हक्क नाकारलात तर आम्ही स्वतःला पेटवू!

ओबीसी बहुल असलेल्या या गावाने पिढ्यान्पिढ्या भाजप, राष्ट्रवादी आणि स्थानिक नेत्यांना भरभरून मतदान दिलं. मग आज आमच्याच गावाचा विकास का रोखला जातो? हा ओबीसी समाजावर उघड अन्याय नाही का असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत. आता शब्द नाही, जिवंत जाळून दाखवू, असा थरारक इशारा त्यांनी दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.सामाजिक कार्यकर्ते व सर्वपक्षीय नेत्यांचा पाठिंबा, आंदोलन उग्र होण्याची चिन्हे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, यशवंतसेनेचे भारत सोन्नर, आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष सुभाष राऊत, राष्ट्रवादी शरदचंद्र काँग्रेसचे मनोहर डाके, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, शेतकरी संघटनेचे माजलगाव तालुक्याचे तालुकाध्यक्ष सुभाष आबा मायकार आदींनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा जाहीर केला आहे. ग्रामस्थांचा अंतिम इशारा१५ सप्टेंबरपासून आम्ही शांततेचा मार्ग धरला आहे. पण लवकरात लवकर काम सुरू न झाल्यास आंदोलन उग्र करून सामूहिक आत्मदहनासारखे टोकाचे पाऊल उचलू, असा जाहीर इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.सुकळीकरांच्या या आमरण संघर्षाची झळ आता जिल्हा प्रशासनासह राज्य पातळीवर पोहोचली आहे. उड्डाणपुलाचे काम तात्काळ सुरू न केल्यास उद्भवणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्फोटक इशारा गावकऱ्यांनी देत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्वालामुखीचे रूप घेतले आहे.

=====================
=============
---------------------

### धनगर समाज बांधवांच्या हिताचा निर्णय तातडीने घ्यावा-आ. सोळंके

(आण्णा) गायके यांच्याकडे सपूत केल्याबद्दल माननीय आमदार साहेबांचे मनपूर्वक आभार व्यक्त केले तसेच उपस्थित समाज बांधव वडवणी तालुक्याचे नेते राजाभाऊ मुंडे जि प माजी सभापती कल्याण अबूज व कारखाना संचालक वगरे नाना. भुजंग गायके आप्पाराव भुतकर भैय्या साखरे व इतर समाज बांधव उपस्थित होते.

---------------------

### तरूणांना नौकरी च्या मागे न लागता उद्योग व्यवसायात नावलौकिक मिळवावे- डॉ योगेश क्षिरसागर

विवेक सवाई आणि सुशांत सवाई यांनी मिळून काळे संकुल, माने कॉम्प्लेक्स जवळ ब्रँड हब नावाचे बीडच्या सौंदर्यात भर टाकणारे रेडिमेट कपड्या च्या दालनाची सुरुवात काल केली असून. या ब्रँड हब मध्ये लिवाइस, यु एस पोलो, स्पायकर, मुफ्ती,या नामंकित ब्रँडची जीन्स टी शर्ट मिळणार असून काल रोजी या दालनाची उद्घाटन डॉ योगेश भैया क्षिरसागर यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी बोलताना योगेश क्षीरसागर म्हणाले स्पर्धेच्या युगात तरुणांनी उद्योग व्यवसाय, आणि शेतीकडे वळण्याची गरज असून चांगले शिक्षण घेऊन सुद्धा प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळेल अशी सध्या देशात परिस्थिती नसून आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नोकरी करणे गरजेचे नसून उद्योग व्यवसाय करून सुद्धा तरुण आपली व आपल्या परिवाराची चांगल्या प्रकारे उपजीविका करू शकतात आणि आईवडिलांनाचे स्वप्न पूर्ण करू शकतात.. विवेक सवाई, आणि सुशांत सवाई यांना जयदीप सवाई यांनी मोठी मेहनत करून हा व्यवसाय उभा करून दिला असुन भविष्यात या दोघा भावांना जयदीप सवाई यांचे स्वप्न पूर्ण करून या ब्रँड हब दालनाच्या बीड शहर भर शाखा निर्माण करून या उद्योग व्यवसायात नावलौकिक मिळवावे माझ्या सदिच्छा आणि शुभेच्छा सदैव त्यांच्या पाठीशी आहेत.. या उद्घाटन समारंभास बीड शहरातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता....

---------------------

### लाडक्या बहिणींनी ई- केवायसी करून घ्यावी-विधानसभाप्रमुख कैलास कावरे

केवायसी माध्यमातून लाभार्थ्यांचे आधार प्रमानीकरण केले जाणार आहे ही प्रक्रिया अतिशय सहज सोपी व सुलभ असून महिला स्वतःच्या मोबाईल वरूनही ही प्रक्रिया पूर्ण करू शकतील अशी प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे त्यामुळे लाभार्थ्यांनी पुढील दोन महिन्यात स्वतःहून ई- केवायसी पूर्ण करून घ्यावी व कोणत्याही अफवाला आमिषाला बळी पडू नये असे आवाहन युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी केले आहे

---------------------

### *भुजबळांच्या उपस्थितीत बीड येथे होणाऱ्या* महाएल्गार मेळावा नियोजनासाठी

आहेत. तरी उद्या आयोजित केलेल्या बैठकीला गेवराई तालुक्यातील सर्व ओबीसी कार्यकर्ते - पदाधिकारी तसेच ओबीसी समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी समाजाच्या वतीने ओबीसी समन्वयक सुघोष मुंढे सर व महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे.

---------------------

### आष्टी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने बळीराजाचे अतोनात नुकसान

भीमराव धोंडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रश्न घेऊन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांची भेट घेतली व तातडीने त्यांचे प्रश्न सोडवण्यास सांगितले यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले की आष्टी तालुक्यातील सर्व मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे.त्यामध्ये दौलावडगाव.दादेगाव.धानोरा.कडा.धामणगाव व पिंपळा या मंडळामध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली होती त्यामध्ये शेतकऱ्याच्या जमिनी पुराच्या पाण्यामुळे खरडून गेल्या आहेत.सध्या ही पाऊस चालूच आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.तसेच अनेक विहिरी बोरवेल बोलून गेले आहेत.जीवीत हानी व घराचे दुकानाचे तसेच शेतातील पिकाचे व फळबागाचे आपणास नुकसान झाले असून त्या ठिकाणी तात्काळ पंचनामे करून खासबाब म्हणून शासनामार्फत मिळणाऱ्या तातडीच्या आर्थिक मदत निधी पूर्वस्थिती पाहता दुपटीने वाढ करण्याबाबत वरिष्ठ कळवून तात्काळ अन्नधान्य आर्थिक मदत अत्यावश्यक ती मदत देण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष.अशोक साळवे.नियमत बेग.ॲड.रत्नदीप निकाळजे.शिवाजीराव सूर्यवंशी.सरपंच दादा जगताप.सरपंच.भाऊसाहेब कोकरे.सरपंच संभाजी झांबरे.सरपंच.अभय गर्जे.सरपंच.ज्ञानेश्वर वाघ.पत्रकार.युवराज खटके.पत्रकार.संजय खंडागळे.बाळासाहेब शेकडे.मा.सरपंच.साके चंद्रशेखर.मा.सरपंच.संजय नालकोल.रघुनाथ शिंदे.अस्ताक शेख.राजदीप निकाळजे.रोहिदास सोनवणे. सदाभाऊ दिंडे.आदेश निमोणकर.बाबासाहेब ससाने.मच्छिंद्र सदाफुले आदी कार्यकर्ते.ज्येष्ठ नागरिक.तालुक्यातून ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------

### आय लव मोहम्मद पैगंबरांच्या सन्मानार्थ सिरसाळ्यात सकल मुस्लिम समाज एकवटला

सोडावे. कोणते धर्मांच्या ज्येष्ठांचा अपमान करणाऱ्या विरुद्ध कठोर कायदा करावा अशा मागणीचे निवेदन सिरसाळा पोलीस स्टेशन मार्फत भारताचे राष्ट्रपती यांच्या मार्फत देण्यात आले आहे. पोलीस स्टेशन ला निवेदन देण्यासाठी सिरसाळ्यातील शेकडो मुस्लिम समाज बांधव एकत्र आले होते. आय लव यू मोहम्मद नावाचे फलक प्रत्येक युवकाच्या हातात पाहायला मिळाले. रॅलीत मोठ्या संख्येने जेष्ठ मुस्लिम व युवा वर्ग दिसून आला आहे. नागरिक मुस्लिम युवक उपस्थित होते.

---------------------

### परळीत २९ सप्टेंबर रोजी सुजात दादा आंबेडकर यांची एल्गार सभा-किरवले

आहे. सुरू झाला असून याचाच एक भाग म्हणून परळी शहरात वंचित ची एल्गार सभेचे नव्हेच तर वंचितच्या हक्काचे आणि स्वाभिमानाचा रामघोष असून माननीय सुजाता आंबेडकर यांची परळी या ठिकाणी सभा ठरवलेली आहे. उद्याचा बदल त्यामुळे ही सभा आयोजित करण्यात आली असून या सभेचे पूर्ण नियोजन तयारीसाठी काल परळी शहर तालुक्यातील अनेक पदाधिकारी हितचिंतक व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी भारतीय बौद्ध महासंघाचे तालुका अध्यक्ष वाघमारे समता सैनिक दलाचे प्रमुख डॉक्टर स्वप्निल महालिंगेश्वर धम्मपाल बचाटे डॉक्टर सिद्धार्थ जगतकर यांच्या सह वंचित बहुजन आघाडीचे वंचित युवा आघाडी यांच्यासह विविध शाखा चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते सिरसाळा सर्कल मधून वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते गाढे पिंपळगावचे सरपंच घुमरे व युवा नेतृत्व यांचे एम के किरवले संतोष किरवले बाळासाहेब तिरमले अमोल भैया किरवले यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. तरी सिरसाळा परिसरातील आंबेडकरी चळवळीतील सर्व कार्यकर्त्यांनी या सभेला संबोधित करण्यासाठी परळी या ठिकाणी उपस्थित राहावे अशी आवाहन वंचित बहुजन आघाडी शिरसाळा सर्कल प्रमुख अमोल भैया किरवले यांनी केले आहे.

---------------------

### ढगफुटीमुळे शेती पिके आणि वाहनांचे अतोनात नुकसान

पोपट आश्रुबा शेकडे

यांच्या मोटारसायकली यांचा समावेश आहे. या सगळ्या वाहनांचे पाण्याच्या प्रवाहात पूर्णपणे नुकसान झाले असून, वाहनमालक हवालदिल झाले आहेत. तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. आमचं जगणं उद्धस्त झालं आहे; शेती, पिकं, वाहनं सगळं वाहून गेलं. शासनाने आमची दखल घेऊन भरपाई द्यावी, अशी विनंती गावकऱ्यांनी केली आहे. फक्त वाहनेच नाही, तर या पुरामुळे उभी सोयाबीन आणि इतर पिकेसुद्धा वाहन गेली आहेत. शेतकऱ्यांच्या मालकी हक्काच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून, त्यांना आर्थिक फटका बसला आहे.

---------------------

**गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हा शिक्षण विभागाला लागलेला** ठोस असे पाऊल उचलू शकत नाही शिक्षण क्षेत्रात शिक्षक असो वा अधिकारी हा या संस्कृतीने गुरु मानले आहे त्यांना गुरु चा मान दिला जातो मात्र असे नालायक गुरुवर्य जर आपल्या मुलीसारख्या विद्यार्थिनीवर अत्याचार करीत असतील तर अशा निर्लज्ज अधिकाऱ्यांना पालकांनी पालकांनी चोप दिला पाहिजे पालक आपले मुलं शिक्षकांच्या व अधिकाऱ्यांच्या विश्वासावर शाळे त पाठवीत असतात मात्र अशा शिक्षक व अधिकाऱ्यांनी निरागस मुलांचे संरक्षण करण्याऐवजी जर शोषण करीत असतील तर अशा अधिकाऱ्याला तात्काळ फाशी दिली पाहिजे अशी मागणी मानवी हक्क अभियान चे परमेश्वर अडागळे यांनी केली आहे.

CMYK

# बीड शहर बचाव मंचच्या वतीने महिला,बाल अत्याचार व तस्करी विरोधी जिल्हास्तरीय परिसंवाद संपन्न

बीड (प्रतिनिधी):- बीड शहर बचाव मंच व गेल्या २५ वर्षापासून गोवा' सारख्या राज्यात सातत्याने महिला,बाल ट्राफिकिंग आणि रेस्क्यू या विषयांवर प्रत्यक्षात जमिनीवर काम करणारे एन.जी.ओ.-ठन',अर्ज',यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच बीड शहरातील नगर रोड येथील नीलकमल हॉटेल हॉल येथे महिला बाल अत्याचार व तस्करी या विषयांवर जिल्हास्तरीय एक दिवसीय परिसंवाद चर्चा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये फार मोठ्या संख्येने बीड शहरातील व इतर तालुका भागातील सामाजिक पातळीवर प्रबोधन करणारे अग्रणी बुद्धिजीवी, मोठ्या संख्येने वकील संघाची वकील मंडळी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य मंडळी, विविध संघटना व सामाजिक संस्थांचे प्रमुख पदाधिकारी, पोलीस दलाच्या वतीने महिला पोलीस अधिकारी, विविध पक्षांमध्ये राहून सामाजिक कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेली ज्येष्ठ पदाधिकारी मंडळी, मोठ्या संख्येने शहरातील जागृत महिला वर्ग, एस.डी.पी.आय पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, तुळजाभवानी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, निवृत्त पोलीस व इतर क्षेत्रातील अधिकारी, जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलनच्या प्रमुख महिला प्रतिनिधी व पदाधिकारी, मोठ्या संख्येने अनेक सामाजिक महिला कार्यकर्त्या व




विविध सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधी, जिल्हा आरोग्य विभागाचे प्रतिनिधी, विविध वृत्तपत्रांचे पत्रकार प्रतिनिधी व संपादक मंडळी या सर्व शहरातील जनतेच्या उपस्थितीचा सहभाग होता.अशा पद्धतीने शहरातील विविध क्षेत्रांमधील काम करणारे सुज्ञ व जागरूक महिला, पुरुष नागरिक फार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अतिशय शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने ठेवलेला हा कार्यक्रम अनेक विचारवंतांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरामध्ये बऱ्याच काळानंतर पहिल्यांदाच अभूतपूर्वपणे यशस्वी करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने महिला बाल अत्याचार व तस्करी आणि ऑर्गनाईज्ड क्राईम,एक संघटित गुन्हेगारी व तसेच यावरील उपाय योजना, पीडितांचे पुनर्वसन, शासन स्तरावरील व विविध सामाजिक संस्थांचे यामधील योगदान, यासंदर्भामध्ये मदत मिळविण्यासाठीची योग्य ठिकाणे, अशा सर्व विषयांवर उपस्थित विचारवंतांनी माहितीपर सखोल, अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील जनतेने स्वतः जागरूक राहून या सर्व विषयांवर समाजामध्ये जागरूकता आणण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे, ही फार मोठी वर्तमान काळाची व पुढच्या पिढीच्या चांगल्या भवितव्यासाठीची गरज आहे असे या अशा प्रकारच्या विचार मंथनातून निष्पन्न होते. समाज प्रबोधनाच्या कार्यामध्ये 'बीड शहर बचाव मंच' परिवारातील सर्व लोक सातत्याने अग्रणी व समाजामध्ये उघड्या डोळ्याने काम करण्यासाठी सतत तत्पर आणि कटिबद्ध राहतील. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बीड शहर बचाव मंच परिवारातील सर्वांनीच प्रयत्न केले.**बीड शहर बचाव मंचच्या वतीने महिला,बाल अत्याचार व तस्करी विरोधी जिल्हास्तरीय परिसंवाद संपन्न..

# ओटीपी येईना, लाडक्या बहिणींना त्रास

## ई-केवायसी करताना अडचणीवर अडचणी

मुंबई (प्रतिनिधी):- राज्यातील सर्व लाडक्या बहिणींना ई-केवायसी करणे राज्य सरकारने सक्तीचे केले. त्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. फडणवीस सरकारकडून याबाबत अधिकृत शासन निर्णय जारी करण्यात आला. त्यानंतर राज्यातील लाडक्या बहिणींकडून केवायसी करण्यास सुरुवात केली. पण केवायसी करताना अडचणींचा सामना करावा लागतोय. योजनेच्या अधिकृत संकतेस्थळावर एरर येत



आहे. तर काही मोबाईल क्रमांकावर ओटीपीच येत नाही, त्यामुळे लाडक्या बहिणींना त्रास सहन करावा लागत आहे.

महाराष्ट्रातील महिलांना आर्थिक मदतीचा हात देण्यासाठी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची मदत दिली जाते. पण यामध्ये अनेक अपात्र महिलांनी घुसखोरी केल्याचे पडताळणीनंतर समोर आले. त्यामुळे राज्य सरकारकडून प्रत्येकवर्षी ई-केवायसी करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी नुकताच एक जीआर काढण्यात आला. त्यामध्ये महिलांना ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले. केवायसी पूर्ण केली नाही, तर १५०० रुपयांची आर्थिक मदत बंद केली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

केवायसी करण्यासाठी राज्यभरातील महिलांनी सुरुवात केली आहे. पण त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. काही महिलांना लिहिता-वाचता येत नाही, त्यामुळे दुसरीकडून केवायसी करावी लागते. त्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत.

# स्वराज्य नगर बीड येथील पोकसो गुन्ह्यात आरोपीस जामीन मंजूर

बीड (प्रतिनिधी):- अल्पवयीन मूलगी पळून जाऊन लग्न करून राहत्या घरी अत्याचार केल्याप्रकरणी तक्रार दिल्यावरून शिवाजी नगर बीड पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता ,कलम १३७(२),६४(१),६५(१),४९ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,१७, अन्वये,व ६ बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ गुन्हा क्रमांक ४२५ /२०२५ नोंदवण्यात आला होता. आरोपी राहुल तुपे यांच्यावर पळून जाऊन लग्न करून पीडितेवर अत्याचार केल्याबाबत व



पिढीतेची फसवणूक केल्या बाबत गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले होते. आरोपीच्या वतीने ड. दीपक अशोकराव ससाणे यांनी केलेला तडाखेबंद युक्तिवाद आणि अभियोग पक्षाच्या मुद्द्यांचं चोख निरसन ग्राह्य धरून मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित दिनांक १६/०९/२०२५ रोजी जमीन मंजूर करण्यात आला. या कामात ड.दिपक ससाणे यांना ड.प्रकाश गलांडे, ड. नामदेव जाधव, ड.अजित ओव्हाळ यांनी सहकार्य केले.

सदरच्या प्रकरणाकडे बीड सह पंचक्रोशीतील नागरिकांचे लक्ष लागले होते. गंभीर गुन्ह्यामधून कमीत कमी वेळामध्ये जामीन मंजूर करून घेतल्याबद्दल एडवोकेट.दिपक ससाणे साहेब व सर्व सहकाऱ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मंत्री पंकजाताई मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी भेट



बीड (प्रतिनिधी): राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी रविवारी (दि.२१) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान क्षीरसागर कुटुंबीयांच्यावतीने पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी नगराध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर, संपादक दिलीप खिस्ती, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, डीसीसी बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, चंपावती शिक्षण संस्थेचे चंद्रकांत मुळे, सलीम जहांगीर, भाजप अल्पसंख्याक नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे यांच्यासह भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींनी तातडीने केवायसी करून घ्यावे-शेख युसुफ

बीड :- राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र बहिणींना मासिक आर्थिक सहाय्याचा लाभ मिळण्यासाठी केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते शेख युसुफ यांनी केले आहे. या योजनेत मोठ्या संख्येने लाभार्थिनी नोंदणीकृत असून, सुरू झालेले केवायसी प्रतिक्रिया पूर्ण करून घ्यावे. त्यामुळे त्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होण्यात अडथळे निर्माण होत आहेत.ईकेवायसी प्रक्रिया सुरुवात १८ सप्टेंबर,ईकेवायसी शेवटची दिनांक १८ नोव्हेंबर,ईकेवायसी केल्यास १५०० हफ्ता मिळणार,ईकेवायसी दरवर्षी करावी लागणार असे शेख युसुफ यांनी सांगितले की, तसेच ही योजना



महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मात्र लाभ मिळवण्यासाठी लाभार्थी बहिणींनी विलंब न लावता जवळच्या बँक किंवा सीएससी केंद्रावर जाऊन आपले केवायसी पूर्ण करून घ्यावे. प्रशासनाने गावपातळीवर जनजागृती मोहीम सुरू केली असून, शेख युसुफ यांनी प्रत्येक लाभार्थिनीला यात सक्रिय सहभाग घ्यावा,कोणाला अडचण असल्यास ८७९३७८७८४३ या मोबाईल क्रमांक वर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. योजनेचा लाभ सर्व पात्रांना मिळावा, यासाठी त्यांनी नागरिक व स्थानिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शहापूर मजरा शिक्षकांना निरोप समारोप


माजलगाव (प्रतिनिधी); माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शहापूर मजरा येथे शाळेचे शिक्षक यांच्या नुकत्याच झालेल्या बदली मध्येशहापूर मजरा येथील शिक्षक यांची बदली झाली त्या निमित्त पालक व गावकऱ्यांच्या वतीने निरोप समारोपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यामध्ये आप्पासाहेब चव्हाण सरयांच्या साथीने मुख्याध्यापक संतोष साबळे सर यांनी आपल्या कार्यसेवेत सर्वात चांगला गाव म्हणून उल्लेख केला या गावात मी जे काम केले याला गावतील नागरिक विद्यार्थी पालक यांनी मला मोलाची साथ दिली त्यामुळे आमची शाळा तालुक्यातील सात



नंबर ला होती आणि केंद्रात एक नंबर होती त्यामुळे मी इथेजास्त काम केले यामध्ये गावातील नागरिकाची मोलाची साथ होती त्यामुळे आज आमचा निरोप समारंभाचा कार्यक्रम केला असे वेक्ती होत असतानाच शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांना गहिवरून आल्याने अश्रू वाहू लागले या गुरु शिष्याच्या प्रेमाचा प्रतीक पाहून गावातील नागरिकांचे देखील मन भरून आले आणि आनंदात उत्साहात निरोप दिला यावेळी उपस्थित सरपंच नवनाथ आळणे माजी उपसरपंच प्रकाश आळणे शालेय समिती अध्यक्ष संतोष गाढवे शालेय समिती उपाध्यक्ष नवनाथ शिंदे सह अन्य गावकरी लहान थोर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अजितदादा विवेक जागा ठेवून गतिमान सरकारला खोडा घालणाऱ्या कर्तव्यदक्ष नव्हे तर इव्हेंटदक्ष जिल्हाधिकाऱ्यांना हाकला

## शेतकऱ्यांना नुकसानभरपाई निधीचा ऑगस्ट महिन्याच्या प्रस्तावाला १७ सप्टेंबर उजाडले : डॉ.गणेश ढवळे




बीड (प्रतिनिधी)- राज्यभरात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून तातडीने मदत देण्याची मागणी सर्व स्तरावर होत आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे प्रशासनाला गतिमान केल्याचे सांगत असले तरी बीड जिल्हा प्रशासन मात्र कागदोपत्री उपक्रम राबवण्यात व्यस्त दिसत असून, शेतकऱ्यांच्या मदतीबाबत मात्र अनास्थाच दाखवत असल्याचा आरोप होत आहे. ३ दिवसांपूर्वीच राज्य शासनाने परभणी जिल्ह्यास मदत जाहीर केली, मात्र त्यात बीडचा समावेश नव्हता. बीड जिल्ह्यातील ऑगस्ट महिन्यातील नुकसानीचा निधी मागणीचा प्रस्ताव मंत्रालयात १७ सप्टेंबरला पोहोचला आहे. म्हणजेच जिल्हा प्रशासनाकडूनच विलंब झाल्याचे चित्र उघड झाले आहे.

बीड जिल्ह्यातील कर्तव्यदक्ष नव्हे तर इव्हेंटदक्ष अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीमुळेच पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या गतिमान सरकारला खोडा घातला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे या जिल्हाधिकाऱ्यांची बीड जिल्ह्यातून हकालपट्टी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे. तसेच पंचनाम्यावर वेळ न घालवता बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील ऑगस्ट महिन्यातील नुकसानीचा प्रस्ताव

नुकसानग्रस्त शेतकरी: १ लाख १४ हजार ७७३ नुकसानग्रस्त क्षेत्र: ६६ हजार ७३१ हेक्टर निधी मागणी: ५६ कोटी ७३ लाख विशेष प्रकरण: गेवराई तालुक्यातील २ गावांतील २० हेक्टर जमीन खरडली गेली असून त्यासाठी अतिरिक्त ९ लाख निधीची मागणी

# कार्यशील नगराध्यक्षा शिताताई बनसोड यांचा ५५ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

केज (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज च्या वतीने केज नगरीच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सीताताई बनसोड यांचा ५५ वा वाढदिवस दि.२० सप्टेंबर २०२५ वार शनिवार रोजी शासकीय निवासस्थान येथे सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) धडाडीच्या कार्यकर्त्या केजच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या, कार्यशील नगराध्यक्ष सीताताई बनसोड यांचा वाढदिवस शाल ,श्रीफळ हार, पुष्पगुच्छ देऊन त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. वाढदिवसानिमित्त गाण्यांची मैफिल रंगली. बार बार दिन ये आये या गाण्याने सर्वांना मंत्रमुग्ध केले. गायकांनी प्रेक्षकांची मने जिंकली. अनेक वक्त्यांनी शुभेच्छा पर भाषण केले व शुभेच्छा दिल्या.

सीता ताई बनसोडे अनेक वर्षापासून समाजकारण व राजकारणात सतत अग्रेसर असतात जनतेची कामे करण्यात उत्साही असतात. लोकांविषयी आपुलकी घेऊन त्या सातत्याने काम करीत आहेत. शहरातील कोणत्याही अडचणीतल्या माणसाला मदत करण्याची भूमिका त्या निभावत असतात. चढउतार आले तरी शहरांमध्ये आपले असणारे योगदान देऊन पुढे चालण्याचा त्यांचा प्रयत्न चालूच असतो. केज शहर व शहराच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीसाठी त्या आग्रही राहतात.

शहरात विकासाचे कामकाज चालू असताना सुद्धा सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या सातत्याने कार्यरत असतात. ५५ वर्षे पूर्ण झाले तरी कामाचा तोच उत्साह आहे. आयुष्याची १०० वर्ष पूर्ण करण्याची त्यांची क्षमता आहे. शहरासाठी असेच योगदान त्यांनी पुढच्या काळातही द्यावे, अशा प्रकारची सदिच्छा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज च्या वतीने व्यक्त करण्यात आल्या. त्यांचे आयुष्य सुख-समृद्धीचे जावो, त्यांना दीर्घायुष्य लाभावे ही सदिच्छा व्यक्त करण्यात आली. त्यांच्याकडून या परिसरातील सर्वसामान्य जनतेची व शहराची सेवा घडावी, अशी आमची सगळ्यांची अपेक्षा आहे.

वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदकिशोर मिसाळ, प्रसिद्धीप्रमुख पांडुरंग कसबे, डिजिटल मीडियाचे अध्यक्ष विश्वास राऊत, पत्रकार अनिल वैरागे, पत्रकार दत्ता मुजमुले, इत्यादी उपस्थित होते.

# शेख जफर (राज) यांच्या प्रयत्नामुळे बंद पडलेले पथदिवे पुन्हा सुरू झाले

गेवराई (प्रतिनिधी):- सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे राज गल्ली निकम गल्ली तील बंद पथदिवे पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांच्या आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी पथदिवे तातडीने कार्यान्वित करण्याची



मागणी सामाजीक कार्यकर्ता जफर शेख यांनी नगर परिषदेच्या ऑनलाइन प द्वारे रीतसर तक्रार करुन केली होती, जी नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या वतिने मान्य करण्यात आली. आणि नगर परिषदेचे कर्मचारी शेख जावेद व भोले साहेब यांनी तात्काळ नवीन पथदिवे बसविले सामाजिक कार्यकर्ते शेख जफर (राज) यांच्या या पाठपुराव्याने परिसरातील अंधार दूर झाला असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे व तसेच सामाजिक कार्यकर्ते जफर शेख राज यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेतल्याबद्दल मुख्याधिकारी विक्रम मांडुरके व विद्युत कर्मचाऱ्यांचे आभार मानले

# विसर्जनासाठी गेलेल्या युवकाचा बुडून मृत्यू

बीड (प्रतिनिधी):- गष्णपतीच्या विसर्जनासाठी गेलेल्या तरटेवाडीच्या तरुणाचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना गेवराई तालुक्यातील सिसरमार्ग येथे घडली. या प्रकरणी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



सुदर्शन सुधाकर केंगार (२५, रा. तरटेवाडी, ता. गेवराई) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जनासाठी सिरसमार्ग येथील सिंदफणा नदीपात्रात गेला होता. सायंकाळी सात वाजता विसर्जनादरम्यान तो पाय घसरुन नदीपात्रात पडला. पाणी जास्त असल्यामुळे बुडून त्याचा मृत्यू झाला. नदीपात्रात शोध घेतल्यानंतर त्याचा मृतदेह सापडला. रविवारी त्याच्यावर अंत्यसंस्कार केले गेले.

## टी सी हरवला आहे.

**समाधान बालासाहेब बिक्कड** वर्ग १२ वी या विद्यार्थ्याचा बस मध्ये प्रवास करत असताना तरनळी धारूर प्रवासात इयत्ता बारावी पासाचा टी.सी हरवला आहे कोणाला सापडला तर संपर्क करा.

मो.७६२०९४७०९४

# सुकळीकरांचा स्फोटक एल्गार : उपोषणाचा पाचवा दिवस पेटला राजकीय दबाव प्रशासनाचा कानाडोळा

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्वालामुखीचे रूप घेतलेलं आंदोलन११ उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली चार जणांना दाखल करण्याचा सल्ला नाकारला पाचव्या दिवशी केले अर्धनग्न आंदोलन ग्रामस्थांचा ठाम इशारा उड्डाणपुलाचे काम सुरू करा नाहीतर परिणामांची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची**

बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या सुकळी ग्रामस्थांच्या आमरण उपोषणाला आज सहावा दिवस असून आंदोलन आगीसारखे भडकले आहे. पाचव्या दिवशी शुक्रवारी अकरा वाजण्याच्या सुमारास उपोषणकर्त्यांनी अर्धनग्न आंदोलन उभारले. त्या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शिस्त मंडळ बोलावून चर्चा केली; मात्र कोणताही तोडगा न निघाल्याने ग्रामस्थांनी उपोषणावर ठाम भूमिका कायम ठेवली आहे. काम सुरू



झाल्याशिवाय उठणार नाही,हा त्यांचा ठाम निर्धार प्रशासनाला अडचणीत आणतो आहे.तू कर रडल्यासारखं, मी करतो हाणल्यासारखं प्रशासनाची दुटप्पी भूमिका १२ सप्टेंबर रोजी भूमी अभिलेख विभागाने उड्डाणपुलासाठी लागणाऱ्या शेतजमिनींची मोजणी सुरू केली होती. मात्र महसूल व पोलिस प्रशासनाने राजकीय दबावाखाली ही मोजणी रद्द केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सार्वजनिक हितासाठी असलेला हा उड्डाण पूल केवळ काही राजकीय वरदहस्त असलेल्या शेतकऱ्यांमुळे अडकला आहे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ११ उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडली, तरीही 'नाही'चा निर्धार सहा दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणामुळे शुक्रवारी ११ उपोषणकर्त्यांची पान २ वर...

# आष्टी पोलिसांनी एकाच वेळी दोन गुटखा माफियांना मुद्देमालासह पकडले!

## पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



दौलावडगाव (प्रतिनिधी):- आष्टी शहरांसह, शिदेवाडी या दोन ठिकाणी गुटख्खाची व सुगंधित पान मसाल्याची चोरटी विक्री करण्यासाठी साठा ठेवला असल्याची गोपनीय माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी दोन वेगवेगळे पथके तयार करून दोनही ठिकाणी एकाच वेळ धाड टाकून लाखो रूपयांचा गुटखा पकडल्याची कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आली आहे.

आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील आष्टी व शिदेवाडी येथे दोन्ही ठिकाणी विनापरवाना पान मसाला व गुटख्खाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेला साठा असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांना समजाताच त्यांनी लवाजम्यासह दोन पथके तयार करून शुक्रवारी सकाळी धाड टाकून तंबाखूजन्य पान मसाला व गुटख्याचे पोते ताब्यात घेऊन आरोपी मुर्तजा रूस्तम बेग रा.आष्टी, गणेश ज्ञानदेव खंडागळे रा.शिदेवाडी ता.आष्टी पान २ वर...

# धनगर समाज बांधवांच्या हिताचा निर्णय तातडीने घ्यावा–आ. सोळंके




धारूर (प्रतिनिधी):- मागील अनेक वर्षापासून राज्यातील धनगर समाज बांधवाकडून अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आग्रही मागणी केली जात आहे जालना येथे सकल धनगर समाजाचे मागील चार दिवसापासून श्री दीपक बोराडे यांच्या आमरण उपोषण सुरू आहे या समाजाचे शैक्षणिक सामाजिक व आर्थिक मागासलेपणा लक्षात घेत ही मागणी योग्यच आहे राज्यातील आणि विशेषतः बीड जिल्ह्यातील सकल धनगर समाज बांधवांची आग्रही मागणी लक्षात घेता आपण व्यक्तीश: या प्रश्नाकडे लक्ष द्यावे व धनगर समाज बांधवांचे हिताचा निर्णय तातडीने घ्यावा माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी आज दिनांक २० ९ २०२५ रोजी आरक्षणास पाठिंबा दिल्याचे पत्र श्री यशवंत पान २ वर...



बीड ; बीड सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ पेपरच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक सायं.सिटीझन चे कार्यकारी संपादक चंदन पठाण, निवासी संपादक रफिक पठाण, उपसंपादक शेख वसीम, शहर प्रतिनिधी शेख फहीम, दैनिक सायं.बीड प्रसार चे संपादक समीर काझी आणि पोलीस बॉईज संघटनेचे अध्यक्ष रविंद्र शिनगारे

# भुजबळांच्या उपस्थितीत बीड येथे होणाऱ्या महाएल्गार मेळावा नियोजनासाठी उद्या ओबीसी कार्यकर्त्यांची गेवराईत बैठक

तलवाडा (प्रतिनिधी) :- अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सकल ओबीसी समाजाचे नेते मा.ना.छगनरावजी भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ठिक चार वाजता बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील तमाम ओबीसी समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी महात्मा फुले विद्यालय, भगवान नगर गेवराई याठिकाणी उद्या सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी ठिक दहा वाजता ओबीसी समाजाचे प्रमुख कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव




यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सोमवारी गेवराई येथील महात्मा फुले विद्यालयात होणाऱ्या बैठकीस ओबीसी – भटके विमुक्त समाजातील सर्व कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. या बैठकीला माजी आ.नारायणराव मुंढे, महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस – ड.सुभाषभाऊ राऊत, सत्संग मुंढे, जे.डी.शहा, प्रा.पी.टी.चव्हाण, रासपचे परमेश्वर महाराज वाघमोडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार पान २ वर...

# लाडक्या बहिणींनी ई– केवायसी करून घ्यावी– विधानसभाप्रमुख कैलास कावरे

सिरसाळा (प्रतिनिधी):- परळी मतदारसंघातील सर्व लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी



योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे लाभ मिळावा याकरिता https://ladkibahin.Maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई– केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लाडक्या बहिणींनी पुढील दोन महिन्यात प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी केले आहे राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शिवसेना महायुती सरकारच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना राबवली जात आहे या योजनेच्या माध्यमातून थेट लाभ हस्तांतरण आर्थिक साह्य दिले जाते .महिला व बालविकास विभागाकडून ई– पान २ वर...

# तरूणांना नौकरी च्या मागे न लागता उद्योग व्यवसायात नावलौकिक मिळवावे- डॉ योगेश क्षिरसागर

**बीड च्या सौंदयात भर टाकणारे विंवेक सवाई यांच्या ब्रँड हबचे शानदार उद्घाटन**

बीड (प्रतिनिधी);- सध्याच्या काळात डॉक्टर, इंजिनिअर, पदवीधर, होऊन मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेऊन सुद्धा सरकारी नोकरीची शाश्वती नसून तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योग व्यवसायात नावलौकिक मिळवून आपले आई–वडिलांची स्वप्न पूर्ण करावे असे वक्तव्य बीड विधानसभा मतदारसंघ संघाचे प्रमुख डॉ योगेश भैय्या क्षिरसागर जयदीप सवाई यांचे चिरंजीव विवेक सवाई आणि सुशांत सवाई यांनी काळे संकुल येथे सुरू केलेल्या ब्रँड हबच्या शानदार उद्घाटन प्रसंगी बोलताना केले..



ब्रँड हब च्या उद्घाटनास उद्घाटक म्हणून बीड विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर तप्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे राज्यप्रवक्ते भागवतराव तावरे, कृषी उत्पन्न बाजार समिती कडाचे सभापती रमजान भाई तांबोळी, एमआयएमची बीड जिल्हाध्यक्ष ड शेख शफिकभाऊ, आयकर विभाग छत्रपती संभाजी नगरचे राहुल सवाई आदी मान्यवर उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती अशी सामाजिक क्षेत्रात काम करणारे जयदीप सवाई यांचे चिरंजीव पान २ वर...

# गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हा शिक्षण विभागाला लागलेला कलंक आहे याला फाशी द्या-अडागळे

धारूर (प्रतिनिधी) केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी नराथम ,लिंगपिसाट बेडसकर हा शिक्षण विभागाला लागलेला कलंक असुन अशा नराधमाला तात्काळ फाशी दिली पाहिजे अशी मागणी मानवी हक्क अभियानचे परमेश्वर अडागळे यांनी केली आहे. केज चे गटशिक्षणाधिकारी बेडसकर हा माणूस अनेक दिवसांपासून कोणत्या ना कोणत्या प्रकरणात नेहमी चर्चेत असतो. हा अतिशय माजलेला व निच



प्रव्रतीचा अधिकारी आहे. अशा निच प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांमुळे शिक्षण क्षेत्राला मोठा कलंक लागलेला आहे शिक्षण क्षेत्र हे अतिशय पवित्र मानले जाते मात्र सध्या अशा पवित्र क्षेत्राला अशा नालायक अधिक कार्यामुळे गालबोट लागले आहे बीड जिल्ह्यात या शिक्षण क्षेत्रात यापूर्वी अशा अनेक घटना घडलेल्या आहेत शासन प्रशासन अशा घटनेला पाय बंद घालण्यासाठी पान २ वर...

# आष्टी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने बळीराजाचे अतोनात नुकसान

## तात्काळ सरसकट पंचनामे करून भरपाईत दुप्पट वाढ करून तातडीने मदत द्या मा.आ.भिमराव धोंडे



पिंपळा (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने बळीराजाचे अतोनात निशान झाले आहे.नागरिकांचे घरे पाण्याखाली गेली जनावरे दगावली दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला व्यवसायिकांचे अतोनात नुकसान झाले असून जमिनी खरडून गेले आहेत.तात्काळ पंचनामे करून तातडीची मदत द्या असे निवेदन मा.आ.भीमरावजी धोंडे यांनी तहसीलदार आष्टी यांना देऊन झालेल्या नुकसानीची माहिती दिली व नुकसानीचा मिळणारा मावेजा दुप्पट करण्यात यावा.अशी मागणी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले विविध नुकसान ग्रस्तांना सोबत घेऊन तातडीने प्रश्न सोडवा अशा सूचना प्रशासनाला देखील त्यांनी दिल्या आहेत शुक्रवारी सकाळी मा.आ. पान २ वर...

# आय लव मोहम्मद पैगंबरांच्या सन्मानार्थ सिरसाळ्यात सकल मुस्लिम समाज एकवटला




सिरसाळा (प्रतिनिधी):- दौमोहम्मद पैगंबर यांच्या बद्दल होत असलेल्या अमानकारक बाबीवरून परळी तालुक्यातील सिरसाळ्यात मुस्लिम समाज एकटवला आहे.

उत्तर प्रदेशाच्या कानपूर व शहाजापूर या ठिकाणी या इस्लाम धर्माचे शेवटचे पैगंबर मोहम्मद यांच्यावर टीका होत आहे. दोन दिवस अगोदर जिल्हा कानपूर राज्य उत्तर प्रदेश येथे पैगंबर जयंतीनिमित्त आय लव यू मोहम्मद नावाचं फलक लावण्यात आलं होतं. ते लावल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. ही कारवाई दोषात्मक आहे. भारत सरकारकडे मागणी आहे. की इस्तमाच्या पैगंबराच्या वाढत्या अपमान कारक बाबी लक्षात घेत भारत सरकारने कठोर कायदे करावेत आणि पैगंबराचा अपमान करणाऱ्यांना कठोर शिक्षा करावी. पैगंबराच्या निष्पाप प्रेमींना तात्काळ पान २ वर...

# ढगफुटीमुळे शेती पिके आणि वाहनांचे अतोनात नुकसान

## म्हसोबावाडी गावातील नागरिक हवालदिल



दौलावडगाव (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथे १५ सप्टेंबरच्या रात्री झालेल्या ढगफुटीमुळे गाव आणि परिसरात हाहाकार माजला. मुसळधार पावसामुळे नदीकाठालगत असलेल्या वस्तीवर अचानक पूरपरिस्थिती निर्माण झाली आणि अनेक वाहने, उभी पिके आणि शेती वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

अनेक वाहने नदीपात्रात वाहन गेले असून यात शिवदास आश्रुबा शेकडे यांची चारचाकी गाडी, प्रशांत विठ्ठल बडे यांची पिकअप गाडी, नामदेव देवराव शेकडे, रावसाहेब आश्रुबा शेकडे, पान २ वर...

# परळीत २९ सप्टेंबर रोजी सुजात दादा आंबेडकर यांची एल्गार सभा-किरवले

परळी (प्रतिनिधी):- परळी शहारात २९ सप्टेंबर रोजी सुजात दादा आंबेडकर यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आसलयाची माहिती वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्ह्या प्रशिदीप्रमुक बाबासाहेब जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती आशिकी काल दिनांक रोजी परळी शहर संपर्क कार्यालयात वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष माननीय शैलेश भाऊ कांबळे यांच्या अध्यक्ष खाली व ंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली



वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रसंगीत रोडे महासचिव एडवोकेट संजय रोडे जिल्हा परिषदे प्रमुख बालासाहेब जगतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात येऊन या बैठकी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पण तू वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष आदरणीय एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांचे चिरंजीव युवकांचे चे हृदय स्थान सम्राट आदरणीय सुजाता आंबेडकर यांच्या आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका यांच्या होऊ घातलेल्या निवडणुका पूर्वीचा झंझावात सुरू पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT

CMYK